॥ श्री ॥

## 'प.पू.सद्‌गुरु श्री.मामासाहेब देशपांडे ग्रंथालय व सार्वजनिक वाचनालया'चा दहावा वर्धापन दिन आगळ्या वेगळ्या दिमाखात साजरा :

'श्रीपाद सेवा मंडळ' ह्या सेवाभावी संस्थेच्या 'प.पू.सद्‌गुरु श्री.मामासाहेब देशपांडे ग्रंथालय व सार्वजनिक वाचनालया'चा दहावा वर्धापन दिन, आज आनंदनगर येथील 'माउली' मठात संपन्न झाला. शासनाची 'अ'श्रेणी लाभलेले हे ग्रंथालय, आनंदनगर सिंहगड रोड परिसराचा मानबिंदू आहे.

ह्या सोहळ्याचा समर्पक शुभारंभ, ज्येष्ठ निसर्गप्रेमी श्री.मारुती चितमपल्ली ह्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून झाला. ह्या प्रसंगी, ग्रंथालयाच्या प्रत्येक वर्धापनदिनी वृक्षारोपण करण्याचा व त्यांचे संगोपन करण्याचा आपला मनोदय, मंडळाचे व्यवस्थापक श्री.निरंजन कुलकर्णी ह्यांनी व्यक्त केला.

त्यानंतर 'श्रीपाद-निवासा'तील प.पू.सद्‌गुरु श्री.मामासाहेब देशपांडे सभागृहात ऋषितुल्य अशा श्री.मारुती चितमपल्ली ह्यांचे **'जंगलातले दिवस'** ह्या विषयावर व्याख्यान झाले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत श्री.वसंत महादेव पाटणकर यांनी केले, सूत्रसंचालन श्री.प्रसाद वळवडे यांनी केले, तर पाहुण्यांची ओळख श्री.संयोग पेंढरकर यांनी करून दिली. ठिकठिकाणांहून आलेल्या श्रोत्यांनी तुडुंब भरलेल्या सभागृहात, पुण्याचे उपमहापौर श्री.प्रसन्नदादा जगताप, शिक्षण खात्याचे माजी प्रमुख सचिव श्री.श्रीकांत जोशी इत्यादी मान्यवरांनी देखील हजेरी लावली. वनाधिकारी ह्या नात्याने दुर्गम जंगलांमधून भटकंती करतानाचे आपले रोमहर्षक अनुभव सांगून, स्तिमित झालेल्या श्रोत्यांना श्री.चितमपल्ली ह्यांनी पर्यावरण रक्षणाचे कळकळीचे आवाहन केले. मानवाच्या निसर्गातील हस्तक्षेपाबद्दल बोलताना त्यांनी मानव-वस्तीतले बिबटे, स्थलांतर करणारे हत्ती, नष्ट होणारी चराऊ जमीन इत्यादी समस्यांकडे लक्ष वेधले. ते म्हणाले; ''बिबटे हे जंगले आणि मनुष्यवस्तीच्या सरहद्दीवर राहतात. परंतु ह्या हद्दीवरील जंगले झपाट्याने नष्ट होत असल्याने बिबटे मनुष्यवस्तीत शिरत आहेत. तुमची घरे नष्ट केल्यावर तुम्ही कोठे जाणार ? ह्या सर्व समस्या माणसानेच निर्माण केल्या आहेत आणि आता माणूसच वर्तमानपत्रांतून बिबट्यांच्या समस्येविषयीच्या तक्रारी करीत आहे !''

'घुबड अशुभ असते', 'साप डूक धरतात' वगैरे अंधश्रद्धा असून, 'प्राण्यांमध्ये वैरभाव नसतो' असे ठामपणे सांगून, तसल्या आख्यायिकांमागची साधी वैज्ञानिक व व्यावहारिक कारणे त्यांनी श्रोत्यांना उलगडून दाखविली. ते म्हणाले की; ''माणूस हा एकमेव प्राणी आहे जो आपल्या पुढच्या सात पिढ्यांसाठी मिळवून ठेवण्याचा प्रयत्न करतो. प्राणी मात्र त्यांच्या गरजेपुरतेच आणि भूक लागेल तेव्हाच भक्ष्य मिळवतात !''

त्यानंतर श्रोत्यांनी व विशेषतः शाळकरी मुलांनी, व्याख्यानाला अनुसरून उत्स्फूर्त व अतिशय सुंदर प्रश्न विचारले. या प्रश्नांना श्री.चितमपल्ली यांनी आपला अभ्यास आणि अनुभव यांच्या आधारे अतिशय समर्पक उत्तरे दिली. त्यानंतर आभार-प्रदर्शनाने ह्या सुनियोजित व देखण्या कार्यक्रमाची सांगता झाली.